महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २० डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १७५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये





महत्वाचे

### जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात

## नितिश कुमार यांच्या विरोधात निदर्शने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पाटणा येथे आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्राचे वाटप करत असताना एका महिला डॉक्टराचा हिजाब खेचला होता. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अनेकजण त्यांच्यावर टीका करत आहेत. ठाणे शहरातही या प्रकरणाचे पडसाद उमटतले आहेत. नितीश कुमार यांच्यावर गुन्हा दाखल व्हावा या मागणीसाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात निदर्शने करण्यात आली. मुख्यमंत्री सचिवालयाने १००० आयुष डॉक्टरांना प्रमाणपत्रे वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यात प्रतिकात्मक स्वरुपात काही निवडक डॉक्टर्सना खुद्द मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते प्रमाणपत्रे दिली जाणार होती. त्यानुसार एक मुस्लिम महिला डॉक्टर प्रमाणपत्र घेण्यास पुढे आली. यावेळी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या डॉक्टर महिलेने परिधान केलेला हिजाब खेचण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. बिहारमधील प्रमुख विरोधी पक्ष राष्ट्रीय जनता दलाने एक्सवर हा व्हिडीओ शेअर करत नितीश कुमार यांना लक्ष्य केले. राजकारणा व्यतिरिक्त कलाविश्वातूनही यावर प्रतिक्रिया उमटल्या आहेत. 'दंगल' फेम अभिनेत्री झायरा वासिमने तसेच प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांनीही याप्रकरणावर भाष्य केले आहे. या प्रकरणाचे पडसाद ठाण्यात देखील उमटले आहे. ठाणे शहरातील लब्बैक फाऊंडेशनच्या नगमा शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात नितिश कुमार यांच्याविरोधात निदर्शने करण्यात आली. यावेळी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी केलेले कृत्य अत्यंत अनुचित, अपमानास्पद आणि महिलांच्या सन्मानास धक्का देणारे आहे. एका घटनात्मक पदावर असलेल्या व्यक्तीकडून असे वर्तन होणे म्हणजे समाजातील इतर लोकांनाही अशा प्रकारच्या गैरवर्तनास प्रोत्साहन देण्यासारखे आहे. त्यामुळे आम्ही महिला म्हणून या कृत्याचा विरोध करतो, असे मत या निदर्शनात सहभागी असलेल्या महिलांनी व्यक्त केले. तसेच मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

### अजित पवार गटाच्या महिला कार्याध्यक्षा

## मनिषा भगत शरद पवार गटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** अजित पवार गटाच्या ठाणे शहर महिला कार्याध्यक्ष मनिषा भगत यांनी शुक्रवारी आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत शरद पवार गटामध्ये प्रवेश केला. मनिषा भगत यांनी २०२३ मध्ये अजित पवार गटात प्रवेश केला होता. सध्या त्या अजित पवार गटाच्या ठाणे महिला कार्याध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. मनिषा भगत यांचा जुना परिचय आहे. त्यांनी आमच्यासोबत कामही केले होते. आता त्यांनी विद्वेषाचे राजकारण सोडून आमच्यासोबत येण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा हा निर्णय कौतुकास्पद असल्याचे आव्हाड म्हणाले. तर डॉ. जितेंद्र आव्हाड आणि मनोज प्रधान यांचे नेतृत्व हे सर्वसामान्य आहे. डॉ. जितेंद्र आव्हाड यांनीच मुंब्रा परिसराचा विकास केला आहे. मात्र, काही लोक राजकारणासाठी या विकासात्मक कामांकडे पाहणे टाळत आहेत. ही बाब आपल्या मनाला पटत नसल्यानेच आपण विकासाच्या मार्गाने म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षात जाण्याचा निर्णय घेतला, भगत यांनी सांगितले.

## उबेर संचालकांविरूध्द 'आरटीओ'कडून गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण -** राज्य शासनाच्या परिवहन विभागाचा सेवा पुरवठ्याचा परवाना न घेता ऑनलाईन उपयोजनचा वापर केला. बेकायदेशीर प्रवासी वाहतूक करून शासनाचा महसूल बुडविला. तसेच, उपयोजनावर प्रवासी वाहतुकीसाठी नोंदणी केलेल्या महिलेला दुचाकी स्वाराने मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करून महिलेच्या सुरक्षेला धोका निर्माण होईल अशी कृती केल्याने कल्याण उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांच्या आदेशावरून मोटार वाहन निरीक्षक गणेश लव्हाटे यांनी येथील महात्मा फुले पोलीस ठाण्यात मंगळवारी उंबेर कंपनी आणि त्यांच्या संचालकांविरूध्द गुन्हा दाखल केला. भारतीय न्याय संहितेच्या ३१८ (३), माहिती आणि तंत्रज्ञान कायदा आणि मोटार वाहन कायद्यातील कलम १९२ ए, १९३, १९९, ९३, ६६ कलमाने हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आज अंबरनाथचा मतसंग्राम !

### दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला ● इच्छुक उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ : अंबरनाथ नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज शनिवार, २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. शहरात जवळपास १५०० पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा फौजफाटा सज्ज राहणार असून मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी १६२१ अधिकारी व कर्मचारी सज्ज असणार आहेत.**

अंबरनाथ नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी शनिवारी मतदान आणि रविवारी होणाऱ्या मतमोजणीसाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली. त्यासाठी शहरात ८०० पोलीस कर्मचारी, ११० अधिकारी, राज्य राखीव दलाच्या दोन तुकड्या, ४५० होमगार्ड शहरात नियुक्त असल्याची माहिती परिमंडळ चारचे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी दिली आहे, तर शहराच्या पूर्व आणि पश्चिम भागातील प्रत्येकी ७ शा एकूण १४ प्रभागांत पोलिसांचे पथक सज्ज असणार आहेत, तर १० वर्षांनंतर होऊ घातलेल्या मतदानाचा मतदारांमध्ये उत्साह आहे. त्यामुळे विना अडथळा मतदारांना मतदान करता यावे आणि मतदानाचा टक्का अधिक वाढवण्यासाठी निवडणुक अधिकाऱ्यांचे प्रयत्न आहेत.

शहरात २ लाख ५४ हजार ४७८ मतदार असून यात १ लाख १९ २९२ स्त्री मतदार, तर १ लाख ३५१६४ पुरुष मतदारांचा समावेश आहे. शहरात एकूण २७६ ठिकाणी मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. एकूण २७६ ईव्हीएम मशीन या मतदान केंद्रात ठेवण्यात आल्या असून यात ४९ ईव्हीएम मशीन राखीव ठेवल्या आहेत. पॅनल पद्धत आणि थेट नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी एका मतदाराला तीन मत देता येणार असल्याने तीन मतांसाठी ९० सेकंदाला वेळ लागण्याचा अंदाज निवडणुक निर्णय अधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. सत्ताधारी महायुती आणि विरोधी महाविकास आघाडीसाठी निकराची लढाई ठरलेल्या ह्या निवडणुकीसाठी अखेर आज मतदान होत आहे.



# तूर्तास अटक टळली!

### माणिकराव कोकाटे यांना उच्च न्यायालयाकडून दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना उच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाला आहे. एक लाख रुपायंच्या जात मुचलक्यावर त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. यामुळे आता तूर्तास तरी त्यांची अटक टळली आहे. याप्रकरणी आज हायकोर्टात जवळपास दोन तास युक्तिवाद सुरू होता. नाशिक कोर्टाने माणिकराव कोकाटेंना दोन वर्षांची शिक्षा आणि दहा हजारांचा दंड ठोठवला होता. यानंतर कोकाटेंनी हायकोर्टात धाव घेतली होती, यावर आज दोन तास सुनावणी चालली. हायकोर्ट नेमका काय निकाल देणार याची सर्वांना उत्सुकता होती. मात्र हायकोर्टाने कोकाटेंना एक लाखांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. याआधी काल संध्याकाळी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वीकारला आणि तो मुख्यमंत्र्यांकडे पाठवला होता. यानंतर मुख्यमंत्र्यांनी कोकाटेंचा राजीनामा राज्यपालांकडे पाठवला होता. त्यानंतर नाशिक पोलिस कोकाटेंच्या अटकेची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी अटक वॉरंट घेऊन नाशिकवरून मुंबईत कोकाटे उपचार घेत असलेल्या लीलावती रुग्णालयाकडे रवाना झाले होते.

**काल अटक वॉरंट घेवून नाशिक पोलिस मुंबईत दाखल झाले होते. आधी वांद्रे पोलिसांशी चर्चा करून आणि नंतर कोकाटेंवर उपचार करत असलेल्या डॉक्टरांचा सल्ला घेऊन अटकेची कारवाई करण्यासाठी नाशिक पोलिसांचे पथक रात्री उशीरी लीलावती रुग्णालयात पोहचले होते.**

याप्रकरणी आज हायकोर्टात जवळपास दोन तास युक्तिवाद सुरू होता. नाशिक कोर्टाने माणिकराव कोकाटेंना दोन वर्षांची शिक्षा आणि दहा हजारांचा दंड ठोठवला होता. यानंतर कोकाटेंनी हायकोर्टात धाव घेतली होती, यावर आज दोन तास सुनावणी चालली. हायकोर्ट नेमका काय निकाल देणार याची सर्वांना उत्सुकता होती. मात्र हायकोर्टाने कोकाटेंना एक लाखांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. कोकाटे यांच्याकडील मंत्रिपदाचा कार्यभार बुधवारी रात्रीच काढून घेण्यात आला होताआणि त्यांची खाती उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली होती. त्यामुळे काही तास कोकाटे हे बिनखात्याचे मंत्री होते. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सभागृहात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर विरोधकांनी केलेल्या मागणी नंतर कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून घेण्यात आले होते. त्यांच्याकडे सध्या क्रीडा खाते होते.



## उल्हासनगर मनपा निवडणूकीत "युती विरुद्ध तुटी"चा कस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर महानगरपालिकेच्या राजकारणाला अखेर निर्णायक वळण लागले आहे. ५ एप्रिल २०२२ पासून प्रशासकीय राजवटीत अडकलेल्या शहराला तब्बल साडेतीन वर्षांनंतर लोकशाहीचा श्वास मिळणार आहे. विकासकामांच्या ठप्प अवस्थेने त्रस्त झालेल्या नागरिकांच्या अपेक्षा आता थेट मतदानाच्या रिंगणात उतरल्या आहेत, तसेच महायुतीत सध्या सुरू असलेला ताणतणाव, त्यातच टीम ओमी कलानी गटाचा वारंवार होणारा हस्तक्षेप यामुळे ही निवडणूक केवळ सत्ता बदलाची नव्हे तर "जुने विरुद्ध नवे आणि युती विरुद्ध तुटी" यांचा कस पाहणारी ठरणार आहे. यंदाच्या मनपा निवडणुकीत सर्वात मोठा बदल म्हणजे प्रचारासाठी मिळणारा अत्यल्प वेळ आहे. पूर्वी उमेदवारांना प्रचारासाठी सुमारे ४० दिवसांचा कालावधी मिळत असे, मात्र यंदा तो १५ दिवसांपेक्षाही कमी आहे. ३ जानेवारीपर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार असून, प्रत्यक्ष प्रचारासाठी अवघे १२ दिवसच मिळतील. यामुळे ओळखीचे, संघटनात्मक ताकद असलेले आणि थेट संपर्कात असलेले उमेदवार फायदेशीर ठरण्याची शक्यता अधिक आहे. नव्या चेहऱ्यांना संधी मिळेल की पुन्हा जुनेच चेहरे मैदान मारतील, हा मोठा प्रश्न आहे. या 'फास्ट ट्रॅक'च्या सामन्यात 'वेळ कमी आणि तणाव जास्त' अशी परिस्थिती आहे.



## शिवसेनेच्या जिल्हा संघटक पदी भरत गोंधळे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण वार्ताहर**

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षात अनेक कार्यकर्त्यांचा प्रवेश सुरूच आहे.त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष आणि कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक, भरत गजानन गोंधळे यांचा शिवसेना पक्षात प्रवेश पार पडला. शिवसेना पक्ष संघटनेला अधिक बळकटी देण्यासाठी शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार कल्याण येथील भरत गजानन गोंधळे यांची शिवसेना जिल्हा संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्तीपत्र जारी करण्यात आले आहे. संघटनात्मक कामकाज अधिक प्रभावीपणे राबवणे, शिवसेनेची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे, तसेच मतदारांशी संपर्क साधून पक्षाचे कार्य वाढवण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे शिवसेना संघटनेला नवचैतन्य मिळणार असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. भरत गजानन गोंधळे यांनी पक्षाने दिलेल्या या जबाबदारीबद्दल वरिष्ठांचे आभार मानून संघटन मजबूत करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

# ठाणे जिल्ह्यातील सहा महापालिकांसाठी शिवसेनेतून 3348 इच्छुक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे जिल्ह्यातील सहा महापालिकांच्या निवडणुकीत शिवसेनेतून उमेदवारी मिळावी, यासाठी ३३४८ इच्छुकांनी मुलाखतीचे अर्ज भरले आहेत. यात १५४८ महिलांनी उमेदवारी मिळावी यासाठी अर्ज केला आहे. ठाणे जिल्ह्यातल्या महापालिकांमधील इच्छुकांच्या मुलाखतीचा कार्यक्रम शनिवारपासून सुरु होणार आहे. महापालिकांमधील सदस्य संख्येच्या चार ते पाचपट इच्छुक असल्याने उमेदवारांचा कस लागणार आहे.**

महापालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेनेकडून इच्छुकांच्या मुलाखतींची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. ठाणे जिल्ह्यात उल्हासनगर, कल्याण डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई, भिवंडी निजामपूर, मीरा भाईंदर या सहा महापालिकांचा समावेश आहे. मागील चार दिवसांत या सहा महापालिकामधील एकूण ६१८ सदस्य पदांसाठी शिवसेना पक्ष कार्यालयातून ३३४८ इच्छुकांनी मुलाखतीचे अर्ज सादर केल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. मुंबई महापालिकेप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातील सर्वच महापालिकांमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असल्याचे खासदार म्हस्के म्हणाले.

**उमेदवारी मिळवण्यासाठी महिलांकडूनही मोठा प्रतिसाद, 1548 महिलांचे अर्ज**

ठाणे महापालिकेत १३१ सदस्य असून पक्ष कार्यालयात १२७७ इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेची सदस्य संख्या ११२ असून यासाठी ६८२ इच्छुकांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. उल्हासनगर महापालिकेची सदस्य संख्या ७८ असून यासाठी शिवसेनेकडे ३८५ इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. नवी मुंबई महापालिकेत १११ सदस्य संख्या असून एकूण ४९६ इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. नवी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांच्या मुलाखती वाशी येथे शनिवारी होतील, असे खासदार म्हस्के म्हणाले. भिवंडी निजामपूर महापालिकेत ९० जागा असून यासाठी १७६ इच्छुकांनी अर्ज सादर केले आहेत. ९६ सदस्य संख्या असलेल्या मीरा भाईंदर महापालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेकडून उमेदवारी मिळावी यासाठी ३३२ इच्छुकांनी अर्ज केले आहेत. शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना महायुतीमधून महापालिका निवडणूक लढवेल, अशी घोषणा यापूर्वीच केलेली आहे. त्यानुसार महापालिकांच्या स्तरावर शिवसेना आणि भाजपची जागा वाटपाची चर्चा सुरु आहे. मुंबईतून २७०० हून अधिक इच्छुकांनी उमेदवारीसाठी मुलाखत दिली होती.

# ठाण्यात स्थानिक आघाडीबाबतचा निर्णय अंतिम टप्प्यात - मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : स्थानिक पातळीवर आघाडी करायची किंवा नाही, याचा निर्णय घेण्याचे अधिकार श्रेष्ठींनी स्थानिक नेत्यांना दिले आहेत. त्यानुसार ठाण्यात आघाडीचा निर्णय अंतिम टप्प्यात आला आहे. येत्या काही दिवसात आघाडीचे स्वरुप स्पष्ट होईल, असे सूतोवाच काँग्रेसचे नेते तथा मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केले. उमेदवाराच्या जिंकण्याच्या निकषावरच आघाडीचे जागा वाटप होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.**



दोन दिवसांपूर्वीच ठाण्यात काँग्रेसच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखतींचा कार्यक्रम घेण्यात आला. येथील वसंतराव नाईक सभागृहात झालेल्या मुलाखतींच्या वेळेस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुभाष कानडे, शहर अध्यक्ष विक्रांत चव्हाण, राजेश जाधव, ठाण्यातील पक्षाचे प्रवक्ते आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी दोन टप्यात १५० इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. ठाणे महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी काँग्रेस पक्ष सज्ज असून, यावेळी पक्षाकडून प्रभावी कामगिरी होईल, असा दावाही त्यांनी केला. ठाणे महापालिकेच्या राजकारणात काँग्रेसचा सहभाग टाळून कोणतीही समीकरणे शक्य नसल्याचे त्यांनी नमूद केले. सत्ताधाऱ्यांना ठाण्यातील मूलभूत प्रश्न सोडवण्यात अपयश आले आहे. सत्ताऱ्यांनी विकासाच्या घोषणा केल्या तरी प्रत्यक्षात ठाणेकरांना पाणीपुरवठा, वाहतूककोंडी, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

भाजप आणि शिंदे सेना यांच्यातील अंतर्गत मतभेदांकडे लक्ष वेधत लोंढे यांनी सांगितले की, भाजप-शिवसेना युती जाहीर झाली तरी स्थानिक पातळीवर समन्वयाचा अभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यामुळे ही युती निवडणुकीत कितपत टिकेल, याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली. ठाणे महापालिकेत पारदर्शक कारभार, नागरिकांशी संवाद साधून निर्णय घेण्यावर काँग्रेसचा भर राहील, असा निर्धार व्यक्त करत ठाणेकरांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारी आघाडीच आगामी निवडणुकीत सत्तेत येईल, असा विश्वास लोंढे यांनी व्यक्त केला.






# भिवंडी मनपाची निवडणूक आढावा बैठक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : दिनांक 18-12-2025 रोजी भिवंडी निजामपूर शहर मनपा सार्वत्रिक निवडणुक 2025-26 च्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी, पोलिस विभाग आणि महानगरपालिकेचे अधिकारी यांची आढवा बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये निवडणूक अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांचा आढावा घेतला. मतदान केंद्रावर पुरविण्यात येणाऱ्या सुविधा, तसेच निवडणूक कार्यालयांकरिता कर्मचारी, साहित्य इत्यादीचा आढावा घेतला.




आयुक्तांनी मतदार केंद्र यादी, तसेच मतदान केंद्रनिहाय मतदार यादी तयार करण्याच्या सुचना दिल्या.तसेच मतदान केंद्रावर बुरखाधारी महिला मतदारांची ओळख पटविण्यासाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे बाबत सुचना देण्यात आल्या. यावेळी पोलीस विभागाने त्यांच्या मार्फत करण्यात येणाऱ्या कार्यवाही बाबत अहवाल दिला. पोलीस उपायुक्त श्री. शशिकांत बोराटे यांनी पोलीस निरिक्षकांना सुचाना दिल्या कि, उद्यापर्यंत सर्व राजकीय पक्षांचे बॅनर होडीग मनपाचे प्रभाग अधिकारी काढून टाकतील, त्यानंतरही बॅनर, होडींग लागल्यास गुन्हा दाखल करावा. तसेच आचारसंहिता कालावधीत आचारसंहिता भंग झाल्यास गुन्हा दाखल करण्याच्या सुचना दिल्या. त्याचबरोबर एस.एस.टी. पथक तात्काळ सुरु करणे तेथे सी.सी. टी.व्ही बसविणेत यावे असेही त्यांनी नमुद केले.

प्रातं अधिकारी श्री. अमित सानप यांनी कर्मचारी प्रशिक्षण, मतदान यंत्र तपासणी याबाबत माहिती दिली. आयुक्तांनी निवडणूक निर्णय अधिका-यांना वाहन पुरविणे, तसेच रहाण्याच्या व्यवस्थेचा आढावा घेतला.

या बैठकीस मा. अति.आयुक्त श्री. विठ्ठल डाके, मा. अति.आयुक्त श्रीम. नयना ससाणे, मा. उपजिल्हाधिकारी (रोहयो) ठाणे, श्री. शशिकांत गायकवाड, मा. उपजिल्हाधिकारी (रोहयो) रत्नागिरी, श्रीम. हर्षलता गेडाम, मा. उपविभागीय अधिकारी, भिवंडी श्री. अमित सानप, मा. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), जिल्हाधिकारी, मुंबई शहर श्री. महेश हरिश्चंद्रे, पोलीस उपायुक्त श्री. शशिकांत बोराटे ,मा. नायब तहसिलदार (महसूल), तहसिल कार्यालय, शहापूर श्री. दत्तात्रय बांबळे, मा. तहसिलदार, विक्रमगड, जिल्हा पालघर श्री. मयुर चव्हाण, मा. नायब तहसिलदार (महसुल), ,तहसिल कार्यालय, भिवंडी श्री. आदेश म्हात्रे, मा. नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, भिवंडी श्री. चंद्रकांत राजपूत, मा. उप-आयुक्त (निवडणुक) श्री. विक्रम दराडे, मा. उप- आयुक्त (कर) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, महानगरपालिकाचे व इतर अधिकारी कर्मचारी हे उपस्थित होते.

# कर्मयोगी संत गाडगे महाराज

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा



न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६९ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ठाणे महानगरपालिकेसाठी निवडणूक प्रभारी म्हणून आ. निरंजन डावखरे यांची नियुक्ती



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या स्वाक्षरीने, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेसाठी निवडणूक प्रभारी म्हणून कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनात्मक अनुभव, समन्वय कौशल्य आणि निवडणूक व्यवस्थापनातील सक्षम नेतृत्व लक्षात घेता ही जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली असून, भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी करण्यासाठी ते सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास प्रदेशाध्यक्षांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीमुळे ठाणे शहरातील निवडणूक तयारीला निश्चितच अधिक बळ मिळणार असून, संघटनात्मक शिस्त, नियोजन आणि एकजूट यांच्या माध्यमातून पक्षाची ताकद अधिक भक्कम होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# मुरबाडमधील ठुणे येथील जुना पूल कोसळला
## तालुक्यातील जुन्या पुलांचा प्रश्न ऐरणीवर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील नांदगाव - पाडाळे रस्त्यावरील बांदलपाडा ठुणे दरम्यान असलेल्या डोईफोडी नदीवरील जुना जीर्ण झालेला दगडी पुल कोसळला असून या परिसरातील वाहतुक ठप्प होऊन अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. अनेक वर्षापासून या ठिकाणी जुना पुल पाडून नविन पुल व्हावा अशी मागणी ठूणे- पाडाळे येथील नागरिक करत होते, परंतू ढिम्म प्रशासन व लोकप्रतिनिधीची उदासिनतेमुळे हा पुल होऊ शकला नसल्याने अखेर गुरूवारी रात्री हा पुल मध्येच दबला असून पुलाचे दोन भाग झाले आहेत. सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडली नसून ठूणे, पाडाळे, कोळोशी, अशा चौदा गावांचा संपर्क तुटला असून शाळेय विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, गरोदर महिला,आजारी माणसे, कामगार वर्गाची यामुळे मोठी कोंडी झाली आहे.ढिम्म प्रशासनाच्या दुर्लक्षित पणामुळे ही वेळ आली असल्याचे येथील ग्रामस्थांचे म्हणने आहे. दरम्यान या घटने निमित्त तालुक्यातील हेदवली, चासोळे, न्याहाडी येथिलही जुन्या पुलांचा प्रश्न ऐरणीवर आला असून प्रशासनाने आतातरी लक्ष द्यावे अशी मागणी नागरिक करत आहेत.

**गेले चार वर्ष नविन पुलाच्या मागणीसाठी आम्ही प्रशासनाकडे पाठपुरावा करत होतो. परंतू प्रशासनाने कोणतीही दखल घेतली गेली नसल्याने शेवटी आज पुल कोसळला असून परिसरातील नागरिकांना याचा मोठा त्रास होणार आहे, आतातरी शासनाने लक्ष द्यावे**
**- ज्ञानेश्वर मुरबाडे, ग्रामस्थ ठूणे**

**आराखड्यात मंजूर होऊनही या पुलासाठी गेले तीन वर्ष निधी प्राप्त झाला नसल्याने नविन पुल बांधता आला नाही. परंतु आमदार किसन कथोरे साहेबांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने लवकरच नविन पुलाच्या बांधकामाला सुरवात केली जाईल.**
**- स्वराताई सचिन चौधरी माजी सभापती पंचायत समिती मुरबाड**

**तालुक्यातील सर्वच जुन्या पुलांचे स्ट्रक्चर्रर ऑडिट होणे गरजेचे आहे परंतु अधिकारी वर्ग सुस्त झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता ठाणे कार्यालयातही उपस्थित राहत नसून साईडवरही कधी दिसत नाहीत -सुभाष घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य**

# गोवेली जीवनदीप महाविद्यालयात कला व क्रीडा महोत्सव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी जीवनदीप महाविद्यालय गोवेली कला व क्रीडा कार्यक्रमांचे दरवर्षी आयोजन करीत असते. सदर कला व क्रीडा महोत्सवाला विद्यार्थी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत असतात. सोमवार दिनांक १५- १२- २०२५ ते मंगळवार दिनांक १६- १२- २०२५ रोजी क्रीडा महोत्सव संपन्न झाला ; यामध्ये वैयक्तिक खेळात गोळा, थाळी, भाला कॅरम ,बुद्धिबळ या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सांघिक खेळामध्ये खो-खो, कबड्डी या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या क्रीडा महोत्सवाला मोठ्या प्रमाणात हजेरी लावून सहभाग घेतला. बुधवार दिनांक १७- १२- २०२५ रोजी महाविद्यालयात साडी डे, टाय डे व विविध प्रकारचे खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून त्यांची विक्री करण्यात आली. जेणेकरून विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक कौशल्यात भर पडावी. गुरुवार दिनांक १८- १२- २०२५ रोजी महाविद्यालयात ट्रॅडिशनल डे चे आयोजन करण्यात आले होते.



यामध्ये विद्यार्थ्यांनी पारंपारिक पेहेराव व विद्यार्थिनींनी साडी, सहावारी नऊवारी व पाश्चिमात्य पेहराव करीत मिस्टर अँड मिस जीवनदीप स्पर्धेत सहभाग घेतला व रॅम्प वॉक करीत आपली कला सादर केली. परीक्षकांनी स्पर्धकांना आपल्या पेहराव विषयी तसेच अवांतर प्रश्न विचारले. या कला व क्रीडा महोत्सवाला जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे,सांस्कृतिक विभाग प्रमुख. सतीश लकडे, प्रा.ललिता पवार, प्रा.मोहन गारे या सर्वांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी, स्वयंसेवक यांच्या एकत्रित सहभागाने सदर कला व क्रीडा महोत्सव २०२५- २६ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# पेणमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन | विविध विषयावरील प्रतिकृतीचा समावेश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण पंचायत समिती शिक्षण विभाग पेण तालुका विज्ञान व गणित अध्यापक मंडळ आणि एन.व्ही. जी. एज्युव्हेंचर्स फाउंडेशन्स कोनायसन्स हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने विकसीत आणि आत्मनिर्भर भारतासाठी विज्ञान तंत्रज्ञान या मुख्य विषयावर आयोजित ५३,वे पेण तालुका विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन पेण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन लेडी, नायब तहसीलदार नितीन परदेशी निवासी नायब




तहसीलदार प्रसाद कालेकर पेण नगरपालिका प्रशासन अधिकारी गणेशसींग ठाकूर आणि कोनायसन्स हायस्कूल अध्यक्ष डॉ.मनिष वनगे आणि डॉ. सोनाली वनगे गटशिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन करण्यात आले. १९ व २० डिसेंबर या दोन दिवस चालणाऱ्या पेण तालुका स्तरावरील प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक आणि शिक्षकांसाठी शैक्षणिक साहित्य निर्मिती यामधे प्राथमिक गटात ६१ माध्यमिक गटात ३२ तर शिक्षक शैक्षणिक साहित्य निर्मिती गटात ११ आदिवासी प्राथमिक गट २ व माध्यमिक गट १असे एकुण १०७ विज्ञान प्रतिकृती प्रदर्शनात सहभागी झालेल्या असून यामध्ये घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन, उर्जा बचत, आपत्ती निवारण धोके दर्शन सायरान, एकात्मिक गटशेती, कच-यापासून वीज निर्मिती जलसंधारण आणि वितरण आणि मनोरंजनातून गणित विषयाची आवड या दिलेल्या विविध विषयावर मॉडेल मांडण्यात आल्या आहेत.तालुका स्तरावरील शेवटचे विज्ञान प्रदर्शन सुरू असून निसर्गरम्य अशा रम्य ठिकाणी दोन दिवस विद्यार्थ्यांना मनमोकळ्या प्रसन्न वातावरणात आपल्या सादर केलेल्या विषयावर परिक्षकांना सादरीकरण करून आपले मनोबल उंचावण्यासाठी विद्यार्थी व शिक्षक यात सहभागी झाले आहेत. दोन दिवस चालणाऱ्या विज्ञान प्रदर्शनासाठी पेण पंचायत समिती शिक्षण विभाग सर्व केंद्रप्रमुख शिक्षक उपशिक्षक मुख्याध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.


**नियमित वाचा**
**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**


# गरीबाची पोरंही आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकारी होतात



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : शारीरिक शिक्षणाचा तास असूनही प्रथम सत्रात पावसामुळे मुलांना मैदानावरील खेळ खेळता येत नाहीत शाळेव्यतिरिक्त बाहेरील शिकवणी वर्ग इतर विषयांचा अभ्यास यामुळे देखील विद्यार्थ्यांना पुरेसे खेळायला मिळत नाही. वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना विविध खेळ खेळायला मिळतात सम्राट अशोक विद्यालयात चार दिवस चालणाऱ्या क्रीडा महोत्सवाचे कोळसेवाडी कल्याण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक जगन सापटे, सहाय्यक पोलीस निरीक्षक रूपाली पाटील, संस्थेचे अध्यक्ष पी.टी. धनविजय, राष्ट्रीय कुस्तीपटू प्रेम भोईर,स्वच्छता अधिकारी विक्रम गायकवाड माध्य. मुख्याध्यापक गुलाबराव पाटील व प्राथ. मुख्याध्यापिका सुजाता नलावडे यांच्या उपस्थितीत शाळेच्या क्रीडा महोत्सवाला सुरुवात झाली. जगन सापटे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले आजचे पाहुणे कुस्तीपटू प्रेम भोईर आपल्यासमोरच उदाहरण आहे. खेळाच्या शासकीय कोट्यातून त्याला सैन्य दलात नोकरी मिळाली. आवडीने खेळलात तर खेळ वाया जात नाही. आपण गरीब परिवारातले आहोत.

**- जगन सापटे (पोलीस उप निरीक्षक)**

शिक्षणाकडे लक्ष द्या. गोरगरिबाची पोरही आता आयएएस आयपीएस अधिकारी होत आहेत तुमच्या मधूनही होतील. रूपाली पाटील म्हणाल्या, आरोग्य महत्त्वाचे आहे खेळ, व्यायाम, योगाच्या माध्यमातून सुदृढ शरीर ठेवता येते. शरीराकडे लक्ष द्या. शाळेचे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सहशिक्षक गणेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर संतोष कदम यांनी आभार मानले.






# भविष्यवेध



**शनिवार**
**२० डिसेंबर २०२५**

**मेष**
व्यवसाय योजनेत बदल करणे महत्वाचे आहे. अनुभवी लोकांचे मार्गदर्शन तुमच्या वाढीसाठी उपयुक्त ठरेल आणि सध्या तुमचे उत्पन्न तेवढेच राहील.

**वृषभ**
अतिआत्मविश्वास तुमच्यासाठी हानिकारक असू शकतो, ज्यामुळे तुमच्या कौटुंबिक नातेसंबंधांना धोका निर्माण होऊ शकतो. लोकांशी नीट वागा.

**मिथुन**
कुटुंबातील मालमत्तेशी संबंधित समस्या आज सोडवली जाऊ शकते आणि तुम्हाला वरिष्ठांकडूनही मदत मिळेल. आज घरातील ज्येष्ठ सदस्यांच्या आरोग्याची काळजी घ्या.

**कर्क**
तुमचा व्यवसाय वाढवण्याची कृती करण्यासाठी आज अनुकूल काळ आहे. एखाद्या प्रभावशाली व्यक्तीच्या सल्ल्याने तुम्ही नवीन यश मिळवू शकता.

**सिंह**
दिवस धावपळीचा आणि कठोर परिश्रमाचा असेल, परंतु कामातील यश तुमचा थकवा कमी करेल. गरजू मित्राला मदत केल्याने समाधान मिळेल.

**कन्या**
भावनेच्या भरात महत्त्वाचे निर्णय घेऊ नका, नंतर पस्तावाल. पालकांनी त्यांच्या मुलांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत, कारण जास्त नियंत्रणामुळे विश्वास कमकुवत होतो.

**तुळ**
ऑफिसमध्ये तुमचा कामाचा ताण वाढू शकतो, परंतु तुमचे काम तुमच्या बॉसला प्रभावित करेल. आळसामुळे महत्त्वाच्या कामांकडे दुर्लक्ष करू नका.

**वृश्चिक**
दिवस तुमच्यासाठी आनंदाने भरलेला असणार आहे. लक्ष कामात सुधारणा करण्यावर असेल. मुले त्यांच्या पालकांकडे अधिक लक्ष देतील आणि त्यांचे ऐकतील.

**धनु**
आध्यात्मिक कार्यात थोडा वेळ घालवल्याने मनःशांती मिळेल. जर मालमत्तेच्या समस्येला तोंड देत असाल तर आज निकाल बाजूने येण्याची शक्यता आहे.

**मकर**
तुम्हाला काही नवीन अनुभव मिळू शकतात. कौटुंबिक किंवा वैयक्तिक कारणांमुळे तुम्ही तुमच्या कामाच्या ठिकाणी जास्त वेळ घालवू शकत नाही.

**कुंभ**
सभोवतालच्या लोकांशी सकारात्मक, प्रेमाने वागा. एखाद्या धार्मिक स्थळाला भेट देण्याची योजना आखू शकता, ज्यामुळे शरीर आणि मन दोन्ही आनंदी होतील.

**मिन**
तुमच्या वडिलांकडून आशीर्वाद मिळतील, ज्यामुळे तुमची सकारात्मकता वाढेल. तुमचा आदर आणि सन्मान वाढेल. आज काही आव्हाने येऊ शकतात

# कुळगाव बदलापूर नगरपरिषदेच्या उर्वरित प्रभागांसाठी आज निवडणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** कुळगाव बदलापूर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीतील उर्वरित पाच प्रभागांतील प्रत्येकी एका जागेसाठी शनिवारी मतदान होत असून, या मतदानाकडे उमेदवारांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. निकालाबाबतची चिंता तर आहेच, मात्र कमी मतदान टक्केवारीची पुनरावृत्ती होणार का, याचीही धास्ती उमेदवारांना सतावत आहे. यापूर्वी २ डिसेंबर रोजी नगराध्यक्ष पदासह एक जागेसाठी मतदारांनी मतदान केले आहे. त्यामुळे उरलेल्या जागेसाठी मतदारांना घराबाहेर काढण्याचे मोठे आव्हान निवडणूक यंत्रणा आणि उमेदवारांपुढे आहे.

कुळगाव बदलापूर नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी २४ प्रभागांमध्ये २ डिसेंबर रोजी मतदान झाले होते. मात्र अर्ज अवैध ठरल्याने उमेदवारांनी दाखल केलेल्या दाव्यांवर उशिरा निकाल लागणे, अर्ज मागे घेण्यासाठी अपुरा कालावधी मिळणे तसेच आधीच निवडणूक चिन्हांचे वाटप होणे या कारणांमुळे राज्य निवडणूक आयोगाने येथील सहा जागांची निवडणूक स्थगित केली होती.

यापैकी एक जागा बिनविरोध झाल्याने उर्वरित पाच जागांसाठी शनिवार, २० डिसेंबर रोजी मतदान होते आहे. या पाच जागांसाठी एकूण ५३ हजार ६८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये २५ हजार ७७५ महिला, २७ हजार ९१० पुरुष आणि ४ इतर मतदारांचा समावेश आहे. ५८ मतदान केंद्रांवर हे मतदान होणार असून त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णतः सज्ज असल्याची माहिती सहायक निवडणूक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

२० डिसेंबरला मतदान झाल्यानंतर रविवार, २१ डिसेंबर रोजी २ डिसेंबर आणि २० डिसेंबर या दोन्ही दिवशी झालेल्या मतदानाची एकत्रित मतमोजणी होऊन त्याच दिवशी निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे २ डिसेंबरला मतदान झालेल्या उमेदवारांना गेल्या १८ दिवसांपासून निकालाची प्रतीक्षा असून अनिश्चिततेमुळे त्यांची धाकधूक वाढली आहे. दरम्यान, शनिवारी मतदान होणाऱ्या पाच जागांवरील उमेदवारांनी मिळालेल्या अतिरिक्त प्रचार कालावधीत जोरदार तयारी केली आहे. घरोघरी जाऊन मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला असून निकालासोबतच मतदान टक्केवारी वाढवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे.

**साडेदहा वर्षांनंतर निवडणुक**

सुमारे साडेदहा वर्षांनंतर होत असलेल्या या निवडणुकीबाबत प्रारंभी मतदारांमध्ये उत्साह दिसून आला होता. पॅनल पद्धतीने आणि नगराध्यक्ष थेट जनतेतून निवडून देण्याच्या २००५ नंतरच्या पहिल्या निवडणुकीत ६० ते ६५ टक्क्यांहून अधिक मतदान होईल, असा अंदाज व्यक्त केला जात होता. मात्र प्रत्यक्षात २ डिसेंबर रोजी अवघे ५८.१० टक्के मतदान झाले. या तुलनेने कमी मतदानामुळे अनेक उमेदवारांची चिंता वाढली असून शनिवारी जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्न सुरू आहेत.

# उल्हासनगर महानगरपालिका निवडणूकी संदर्भात राजकीय पक्षांची बैठक संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ सुरळीत, पारदर्शक व यशस्वीरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने श्रीम. मनिषा आव्हाळे भा.प्र.से., निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १९ डिसेंबर २०२५ रोजी महापालिका सभागृहात विविध राजकीय पक्षांचे सचिव, सदस्य व नेते यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीत निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी अधिसूचित करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. निवडणूक प्रक्रिया सुरक्षित व लोकशाही मूल्यांनुसार पार पाडण्यासाठी आदर्श आचारसंहिता तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रक, आदेश व सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन निवडणूक अधिकारी तथा आयुक्त यांनी केले. प्रचार सभांसाठी रीतसर परवानगी घेणे, मतदारांच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन न करणे, पेड न्यूज न देणे आदी बाबींचे पालन करण्यावर विशेष भर देण्यात आला. या संदर्भात विभागीय आयुक्तांनी प्रसिद्ध केलेल्या परिशिष्ट-१ अन्वये निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक काळात "काय करावे व काय करू नये" ही उजळणी पुस्तिका उपस्थित राजकीय पक्षांचे सचिव, सदस्य व नेत्यांना वितरित करण्यात आली. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक नियमांमध्ये काही महत्त्वाचे बदल केले असल्याची माहिती देताना निवडणूक निर्णय अधिकारी श्री. संजय शिंदे यांनी सांगितले की, यापूर्वी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर सादर करण्यात येणारे शपथपत्र आता साध्या कागदावर स्वतःच्या सहीनिशी सादर करता येणार आहे. तसेच निवडणुकीसाठी एका उमेदवारास ९ लाख रुपये खर्चाची मर्यादा दिली आहे. यावेळी काही राजकीय पक्षांच्या सदस्यांनी निवडणुकीसंदर्भात विविध मुद्दे उपस्थित केले असता, त्यांचे निरसन निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांनी केले. तसेच निवडणूक काळात सोशल मीडियावरही आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याचे आवाहन महापालिका आयुक्तांनी केले व सर्वांना निवडणुकीच्या शुभेच्छा दिल्या.

सदर बैठकीस निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे भा.प्र.से.,, निवडणूक निर्णय अधिकारी, श्री. बाळासाहेब तिडके, श्री. गणेश सांगळे, श्री. विजयकुमार वाकोडे, श्री. संजय शिंदे, श्री. मुकेश पाटील, श्री. रविंद्र वीर, तसेच उल्हासनगर तहसिलदार श्रीम. कल्याणी कदम, अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस, उपआयुक्त (निवडणूक) श्रीम. विशाखा मोटघरे, उपआयुक्त श्री. अनंत जवादवार व श्रीम. स्नेहा कर्पे, सहा. आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी श्री. अजय साबळे, सहा. आयुक्त श्री. विशाल कदम व श्रीम. अलका पवार, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम व विविध राजकीय पक्षाचे सदस्य उपस्थीत होते.



- **नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी:**
  २३ डिसेंबर २०२५ ते २९ डिसेंबर २०२५
- **नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी**
  २३ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५
- **नामनिर्देशनपत्रांची छाननी**
  ३१ डिसेंबर २०२५
- **वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिद्धी:**
  छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच
- **नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम तारीखः**
  ०२ जानेवारी २०२६
- **मतमोजणी व निकाल जाहीर करण्याची तारीख**
  १६ जानेवारी २०२६

# कन्फर्म सीटसाठी रेल्वेच्या जेवणाची सक्ती ?

## रेल्वेच्या सुलतानी निर्णयामुळे प्रवाशांमध्ये नाराजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** भारतीय रेल्वेच्या गतिमान एक्सप्रेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता तिकीट बुकिंग करताना नवीन अडचणींचा सामना करावा लागत आहे. आयआरसीटीसीच्या अधिकृत वेबसाइटवर किंवा ॲपवर गतिमान एक्सप्रेसचे तिकीट आरक्षित करताना प्रवाशांना सक्तीचे जेवण घ्यावे लागत आहे. जेवण नकोचा पर्याय नाही त्यामुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे. रेल्वे प्रवाशांच्या मते रेल्वेत सुविधा कमी आणि सक्ती जास्त वाटते. अनेक प्रवाशांनी सोशल मीडियावर आपली नाराजी व्यक्त करत म्हटले आहे की, त्यांना ट्रेनमध्ये दिले जाणारे जेवण आवश्यक नसते, परंतु तरीही त्यासाठी अतिरिक्त पैसे द्यावे लागत आहेत. काहींनी तर याला "रेल्वेची नवी कमाईची युक्ती" असे म्हटले आहे. रेल्वेच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गतिमान एक्सप्रेस "सेमी-लक्झरी" श्रेणीत मोडत असल्याने प्रवाशांना पूर्ण सुविधा देणे आवश्यक आहे. त्यासाठी खाद्यसेवेत तडजोड करता येत नाही, असे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. मात्र, रेल्वेने पूर्वी प्रवाशांना भोजन घेण्याचा वा न घेण्याचा पर्याय दिला होता. प्रवासी संघटनांनी मात्र रेल्वेकडे भोजन पर्याय ऐच्छिक करण्याची मागणी केली असून, प्रवाशांच्या निवडीचा आदर राखणे हीच खऱ्या अर्थाने "सेवा भावना" असल्याचे त्यांनी सांगितले आहे. आता रेल्वे प्रशासन या संतप्त प्रतिक्रियांवर काय प्रतिसाद देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# आचारसंहिता काळात विनापरवानगी पोस्टर्स, बॅनर्स लावल्यास गुन्हा दाखल करणार – आयुक्त सौरभ राव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (19) : महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर शहरातील अनधिकृत पोस्टर्स बॅनर्स हटविण्याची कारवाई महापालिकेच्या माध्यमातून शहरातील 3778 अनधिकृत पोस्टर्स, बॅनर हटविण्यात आले. यापुढे आचारसंहिता कोणत्याही प्रकारचे राजकीय, सामाजिक किंवा वैयक्तिक जाहिरात पोस्टर्स, बॅनर्स, फलक विनापरवानगी लावल्यास संबंधितांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट आदेश आज झालेल्या बैठकीत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.**



आचारसंहिता काळात सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण होऊ नये तसेच निवडणूक प्रक्रियेची निष्पक्षता अबाधित राहावी, या उद्देशाने महापालिकेच्या अतिक्रमण विभाग, परिमंडळनिहाय पथके यांच्या समन्वयाने कडक कारवाई राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शहरातील प्रमुख रस्ते, चौक, सार्वजनिक भिंती, उड्डाणपूल, वीजखांब, बसथांबे आदी ठिकाणी बेकायदेशीरपणे पोस्टर्स व बॅनर्सवर लावणाऱ्या दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले. तसेच महापालिकेच्या माध्यमातून आचारसंहिता लागू झाल्यानंतर तात्काळ शहरातील अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स हटविण्याची तसेच महापालिकेच्या वास्तूवरील कोनशीला झाकण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. विनापरवानगी शहरात अनधिकृत पोस्टर्स, बॅनर लावणाऱ्या व्यक्तींवर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. तसेच आचारसंहितेचे वारंवार उल्लंघन आढळल्यास दंडात्मक कारवाईसह गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया राबविली जाईल, असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. शहरात लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेचे पालन सर्वांनी करावे असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

# कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस सर्वच्या सर्वच पॅनलमध्ये निवडणूक लढवणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवलीत पक्षवाढीसाठी सचिन पोटे यांनी कधीही ठोस काम केले नाही. युवकांना पुढे येऊ दिले नाही आणि आता शिवसेनेत गेल्यानंतर काँग्रेसवर आरोप करत आहेत, ते पूर्णपणे चुकीचे असल्याचा घणाघाती आरोप काँग्रेसच्या माजी नगरसेविका रत्नप्रभा म्हात्रे यांनी केला. कल्याण-डोंबिवलीत काँग्रेसचे नुकसान होण्यास पोटेच जबाबदार असल्याचा दावा त्यांनी केला. "काँग्रेस पक्ष सोडून गेलेल्यांना आमच्या शुभेच्छा, मात्र त्यांच्या जाण्याने पक्षाला काहीही फरक पडणार नाही," अशी स्पष्ट भूमिका काँग्रेसने घेतली आहे. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाचे 50 हून अधिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेसचे कल्याण जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर बोलत होते. "आमच्या पक्षाने काही पदाधिकाऱ्यांना खूप काही दिले, तरीही ते काही कारणांमुळे पक्ष सोडून गेले. कोणत्याही कार्यकत्यपिक्षा पक्ष मोठा असतो. त्यामुळे त्यांच्या जाण्याने काँग्रेसला कोणताही धक्का बसलेला नाही. त्यांच्या जागी नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत." येणाऱ्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस सर्वच्या सर्व 31 पॅनलमध्ये निवडणूक लढवणार असल्याचे सुतोवाचही राजाभाऊ पातकर यांनी केले. दरम्यान, गेल्या 25 वर्षांपासून केडीएमसीवर शिवसेना-भाजप युतीची सत्ता असूनही या काळात एकही नागरी समस्या सोडवता आलेली नाही, अशी टीका महिला जिल्हाध्यक्ष कांचन कुलकर्णी यांनी केली. पाणीटंचाई, आरोग्य सुविधा, अस्वच्छता, वाहतूक कोंडी या समस्या अधिकच बिकट झाल्या असून प्रशासनाचे त्यावर कोणतेही नियंत्रण राहिलेले नाही, असा आरोप त्यांनी केला. सत्ताधाऱ्यांकडून विरोधक संपवण्याचा प्रयत्न सुरू असून, कल्याण-डोंबिवलीत स्वतःचे पदाधिकारी मिळत नसल्याने शिवसेना-भाजप काँग्रेस व राष्ट्रवादीचे पदाधिकारी फोडत असल्याचा टोला प्रदेश सरचिटणीस नविन सिंग यांनी लगावला. काँग्रेस हा देशातील सर्वात जुना पक्ष असून त्याने अनेक वर्षांत भरती-ओहोटी पाहिली आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणूक काँग्रेस पूर्ण ताकदीनिशी लढणार असून पुन्हा एकदा आपले वर्चस्व प्रस्थापित करणार, असा विश्वास प्रदेश उपाध्यक्ष व केडीएमसी प्रभारी राजन भोसले यांनी व्यक्त केला. सध्या 122 उमेदवार उभे करण्यासाठी प्रयत्न सुरू असून, सत्ताधारी भाजपमधील इच्छुकही काँग्रेसमध्ये येण्यासाठी रांगेत असल्याचा गौप्यस्फोट त्यांनी केला.





- काँग्रेस कल्याण जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांचा निर्धार

# केडीएमसी क्षेत्रील बॅनर्स होर्डिंग्सचे निष्कासन





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार शहर विद्रुपीकरणात भर घालणा-या होर्डिग्ज व बॅनर्सवर निष्कासनाची कारवाई नियमित स्वरुपात करण्यात येते.आता स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून आचार संहितेची अंमलबजावणी करणेकामी कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभागामार्फत पोस्टर्स, बॅनर्स, झेंडे व होर्डिग्स यावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली. यामध्ये महापालिकेच्या सर्व प्रभागामार्फत दि. १६/१२/२०२५ सायंकाळ पर्यंत ८५८ पोस्टर्स, १७७४ बॅनर्स, ६८० झेंडे, ३ होर्डिग्स, ११३ भिंतीचित्र, ९० स्टीकर, १७ इतर सामग्री यावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

# खा. नरेश म्हस्के यांच्या कोपरी प्रभागासाठी भाजपाची "फिल्डिंग"

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के हे खासदार म्हणून निवडून आल्यानंतर या रिक्त प्रभागावर म्हस्के हे त्यांच्या पुत्रासाठी आग्रही होते. परंतु युतीची बोलणी सुरु असतानाच, भाजपच्या कोपरीतील पदाधिकाऱ्यांनी म्हस्के यांच्या जागेवार दावा सांगण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे आता कोपरीतील सेना-भाजपतील वाद शिगेला पोहचण्याची शक्यता आहे.

शिवसेना शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के हे अनेक टर्म कोपरी येथील आनंदनगर भागातून निवडून येत होते. येथून नगरसेवक ते महापौर असा पल्ला त्यांनी गाठला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून भाजपसोबत युती केल्यानंतर नरेश म्हस्के यांच्यासह अनेक माजी नगरसेवकांनी शिंदे यांना पाठिंबा दिला होता.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणूकीत म्हस्के यांना शिंदे गटाने उमेदवारी दिली. तर ठाकरे गटाकडून राजन विचारे हे निवडणूक लढवित होते. या निवडणूकीत म्हस्के यांनी राजन विचारे यांचा पराभव केला. म्हस्के हे ठाणे लोकसभेचे खासदार म्हणून निवडून आल्याने आनंदनगर प्रभागाची जागा रिक्त झाली आहे.

या रिक्त जागेसाठी नरेश म्हस्के हे आग्रही असून त्यांच्या पुत्राला येथे उमेदवारी मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील असल्याचे कळते. परंतु आता त्या जागेसाठी भाजपने देखील त्यांच्या वरिष्ठांकडे आग्रह केला. गुरुवारी रात्री झालेल्या एका बैठकीत त्यांनी भाजपच्या स्थानिक आमदारांकडे ही इच्छा बोलून दाखविली. विधानसभा, लोकसभेला धनुष्यबाणाचे बटण दाबावे लागते. निदान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तरी आम्हाला कमळावर मतदान करता यावे असेही पदाधिकारी म्हणाले.

या रिक्त जागेसाठी नरेश म्हस्के हे आग्रही असून त्यांच्या पुत्राला येथे उमेदवारी मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील असल्याचे कळते. परंतु आता त्या जागेसाठी भाजपने देखील त्यांच्या वरिष्ठांकडे आग्रह केला. गुरुवारी रात्री झालेल्या एका बैठकीत त्यांनी भाजपच्या स्थानिक आमदारांकडे ही इच्छा बोलून दाखविली. विधानसभा, लोकसभेला धनुष्यबाणाचे बटण दाबावे लागते. निदान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकीत तरी आम्हाला कमळावर मतदान करता यावे असेही पदाधिकारी म्हणाले.

# राज्याच्या वीज यंत्रणेला महानिर्मितीबरोबर सामंजस्य करार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

■ **बातमीदार**

**मुंबई, ता. १९ :** वीजनिर्मिती केंद्रापासून वितरण उपकेंद्रापर्यंत वीज वाहून आणणाऱ्या उच्चदाब वीज वहन यंत्रणा आणि उपकेंद्राचे जाळे आणखी मजबूत होणार आहे. त्यासाठी महापारेषण ७६५ केव्हीचा पारेषण प्रकल्प हाती घेणार आहे. त्याचाच भाग म्हणून महानिर्मितीबरोबर सामंजस्य करार केला आहे. या प्रकल्पासाठी 'टॅरिफबेस्ड कॉम्पिटिटिव्ह बिडिंग' अंतर्गत संयुक्तपणे निविदा सादर करण्याचा निर्णय दोन्ही वीज कंपन्यांनी घेतला आहे.

भागीदारीमुळे महापारेषणचा पारेषण क्षेत्रातील दांडगा अनुभव आणि महानिर्मितीची मोठ्या वीज प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील तांत्रिक कार्यक्षमता एकत्र येणार आहे. ७६५ केव्ही श्रेणीतील प्रकल्पांसाठी या दोन शासकीय कंपन्यांचे एकत्र येणे राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. हा करार महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार आणि महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

■ **कराराचे फायदे**

या नवीन प्रकल्पांमुळे वीजवहन क्षमता वाढून ग्रिड अधिक स्थिर होण्यास मदत होईल. खासगी कंपन्यांच्या स्पर्धेत आता राज्यातील दोन प्रमुख ऊर्जा कंपन्या एकत्र उतरल्याने प्रकल्प खर्चात बचत आणि गुणवत्तेत वाढ अपेक्षित आहे. भविष्यातील वाढती विजेची मागणी लक्षात घेता ७६५ केव्हीची यंत्रणा ही 'पॉवर कॉरिडॉर'साठी कणा ठरणार आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

जाहीर सूचना

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५

प्रभाग निहाय मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्दीबाबत.

मा. राज्य निवडणूक आयोगाकडील पत्र क्रमांक रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.४१/का-५, दि.१४.१०.२०२५, दि.२६.११.२०२५ व दि.०९.१२.२०२५ अन्वये ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक सन २०२५ करीता प्रभाग निहाय मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिध्द करणेचा कार्यक्रम प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने खाली नमूद केल्याप्रमाणे ठाणे महानगरपालिकेच्या एकूण ३३ प्रभागांकरीता प्रभाग निहाय मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी आज दिनांक २०.१२.२०२५ रोजी माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

प्रस्तूत प्रभाग निहाय मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी www.thanecity.gov.in या संकेतस्थळ, निवडणूक विभाग (मुख्यालय) व सर्व प्रभाग समिती कार्यालय येथे नागरिकांना पाहण्यासाठी ठेवण्यात आल्या आहेत. कार्यालयीन वेळेत संबंधीत कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध राहतील तसेच निवडणूक विभाग, मुख्यालय येथे सदर प्रभाग निहाय मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी मागणी केल्यास नागरी सुविधा केंद्र, महापालिका मुख्यालय येथे शुल्क भरुन विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातील.

ठिकाण : ठाणे
दिनांक : १९.१२.२०२५
ठामपा/पिआरओ/निवडणूक/१०५८/२०२५-२६
दि:१९.१२.२०२५

Pls visit our official web-site
www.thanecity.gov.in

सही/-
सौरभ राव, भा.प्र.से
निवडणूक अधिकारी तथा
महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

ठाणे ■ शनिवार
२० डिसेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# गणिताच्या सराव पुस्तकाचे प्रकाशन आणि वितरण



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्रमांक 68 महात्मा ज्योतिबा फुले प्राथमिक विद्यालय बारावे कल्याण पश्चिम येथे विद्यार्थ्यांना गणिताचा अधिक सराव होण्यासाठी आणि त्याचबरोबर गणित विषयाची आवड निर्माण होण्यासाठी गणिताच्या दोन सराव पुस्तकांच प्रकाशन करण्यात आलं. स्टडी व्हेव्ज संस्थेने तयार केलेली ही पुस्तकें श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना मोफत देण्यात आली.एक ते शंभर पर्यंत पाढे, एक ते शंभर पर्यंत वर्ग, वर्गमूळ तसंच गणिती अन्य क्रिया अधिक वजाबाकी, गुणाकार, भागाकार या जलद गतीने सोडवण्यासाठी विद्यार्थ्यांना या पुस्तकांचा वापर होणार आहे. या पुस्तिका उपस्थित सहावी, सातवी आणि आठवी या इयत्तांच्या मुलांना मोफत देण्यात आल्या. कार्यक्रमासाठी पुस्तकाचे लेखक उमाकांत चौधरी, सर्वदा फाउंडेशनचे अध्यक्ष ईशान कुलकर्णी आणि श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठान चे सचिव मृदुला कुलकर्णी उपस्थित होत्या.

# संस्कार स्पोर्ट्स डे'ने विद्यार्थ्यांमध्ये उसळला क्रीडोत्साह




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** संस्कार एज्युकेशनल चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शिवशांती प्रीमियर लीगच्या व्यवस्थापनाखाली आयोजित करण्यात आलेला 'संस्कार स्पोर्ट्स डे' मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. या क्रीडा महोत्सवात संस्कार क्लासेसमधील सुमारे १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली क्रीडाकौशल्ये सादर केली.

यावेळी कबड्डी, क्रिकेट, धावणे यांसह विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी शिस्त, संघभावना आणि खेळाडूवृत्तीचे उत्कृष्ट दर्शन घडवले. मैदानावर उत्साह, जल्लोष आणि टाळ्यांचा कडकडाट पाहायला मिळाला. या कार्यक्रमाला शिवशांती प्रतिष्ठानचे संस्थापक अ‍ॅड. विनय कुमार सिंह प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात खेळांचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील महत्त्व अधोरेखित करत शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती, शिस्त आणि संघभावना यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पदके, चषक आणि प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्कार क्लासेसच्या संचालिका लक्ष्मी मौर्य, शिक्षकवृंद तसेच सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# भिवंडीतील दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी शहरातील गुरूकुल सायन्स क्लासेस आणि रोटरी क्लब ऑफ कल्याण रिव्हर साइड यांच्या संयुक्त विद्यमाने एसएससी (दहावी) परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अंजुरफाटा येथील ओसवाल शाळेच्या सभागृहात मोफत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग घेऊन परिक्षा संदर्भात माहिती घेतली.

या शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून रोटेरीयन संजय माचवे,नरसी पटेल, मार्गदर्शक प्रजेश ट्रॉट्स्की, गुरूकुल चे सीईओ वैभव ठाकरे, संचालिका भाग्यश्री ठाकरे उपस्थित होते. परिक्षा म्हटली तर विद्यार्थ्यांचे मनात भिती निर्माण होत असते त्यामुळे त्यांच्या अभ्यासावर परिणाम होतो ते काही प्रमाणात तणावाखाली असतात त्यामुळे विद्यार्थ्यांनी उल्हास पूर्ण व निसंकोच वातावरणात अभ्यास करावा यासाठी हे मार्गदर्शन शिबिर आयोजित केल्याची माहिती शिक्षक परेश भानुशाली यांनी दिली.विद्यार्थ्यांनी मनावर कोणत्याही प्रकारचा ताण न ठेवता उल्हासपूर्ण एकाग्रतेने अभ्यास केला तर निश्चितच परिक्षेत उत्तीर्ण यश मिळेल असे मत उपस्थित पाहुण्यांनी यावेळी व्यक्त करून विद्यार्थ्यांना यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक परेश भानुशाली यांनी केले.

# आचारसंहिता काळात अनधिकृत बांधकामे आढळल्यास कारवाई करावी - आयुक्त सौरभ राव यांचे निर्देश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (19) :** महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात आदर्श आचारसंहिता लागू असताना कोणत्याही प्रकारच्या अनधिकृत बांधकामांना थारा देऊ नये, असे स्पष्ट आदेश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. आचारसंहिता काळात नवीन बांधकाम, वाढीव बांधकाम तसेच परवानगीविना सुरू असलेल्या कामांवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी आज झालेल्या बैठकीत सर्व प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्तांना दिले आहेत. तसेच शहरात कुठेही



नव्याने अनधिकृत बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी याबाबत महापालिकेस कळविल्यास त्यावर महापालिकेमार्फत तात्काळ कारवाई करण्यात येईल असेही आयुक्तांनी यावेळी नमूद केले.

ठाणे महापालिकेच्या नागरी संशोधन केंद्र येथे आज आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त (2) प्रशांत रोडे, उपायुक्त उमेश बिरारी, जी.जी. गोदेपुरे, मनीष जोशी, सचिन सांगळे यांच्यासह नऊ प्रभागसमितीचे सर्व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

आचारसंहितेच्या काळात शहरात महापालिकेची संपूर्ण यंत्रणा ही निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्यचा फायदार घेवून शहरात अनधिकृतपणे नवीन बांधकामे होण्याची शक्यता असते. यासाठी सर्व सहायक आयुक्त यांनी आपापल्या प्रभागसमिती कार्यक्षेत्रात नवीन होणाऱ्या बांधकामांकडे लक्ष ठेवावे. सर्व सहायक आयुक्त यांचेवर जरी निवडणुकीच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली असली तरी त्यांनी प्रभागात नियमित तपासणी मोहिमेच्या माध्यमातून अनधिकृत बांधकामे होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. आचारसंहिता काळात नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृतपणे नवीन बांधकामे शहरात सुरू झाली तर त्यावर निष्कसनाची कारवाई करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले आहेत.

तसेच, अनधिकृत करणाऱ्या व्यक्तीवर जबाबदारी निश्चित करून कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. आचारसंहिता काळात कोणालाही सूट देण्यात येणार नसल्याचे आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम सुरू असल्यास महापालिकेकडे तात्काळ तक्रार नोंदवावी, या तक्रारीची दखल घेवून महापालिकेच्या माध्यमातून तात्काळ कारवाई करण्यात येईल असेही आयुक्त सौरभ राव यांनी या बैठकीत नमूद करीत ठाणेकरांनी सजग राहून नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामांची माहिती कळवून महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन केले आहे.

# रायगड विभागीय गायन स्पर्धेत गव्हाण हायस्कूलचे सुयश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत दरवर्षी होणाऱ्या रायगड विभागीय गायन स्पर्धेत गव्हाण शाखेने यंदा पुन्हा एकदा अव्वल दर्जा पटकावलेला आहे. सदर स्पर्धा छत्रपती शिवाजी विद्यालय पळस्पे येथे संपन्न झाली. गट क्रमांक एक मध्ये कुमारी श्राव्या समीर घरत तर गट क्रमांक दोन मध्ये यज्ञ हृदयनाथ मोकल- इयत्ता नववी तसेच याज्ञीक साईनाथ मोकल- इयत्ता आठवी या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

सदर स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी रायगड विभागीय अधिकारी कोंगेरे एम. के. हे होते तर पळस्पे शाखेचे चेअरमन रवींद्रशेठ चोरगे, मोहन गवंडी संगीताताई केळकर, श्रीमती दमयंती भगत,रघुनाथशेठ गवंडी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. पळस्पे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री चिखलेकर सर आणि सर्व शिक्षक बंधू भगिनी यांनी या कार्यक्रमाचे अत्यंत सुंदर आयोजन केले होते. यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या रायगड




विभागातील सर्व शाखांनी सहभाग नोंदवला होता. यात गट क्रमांक दोन मध्ये गव्हाण शाखेतील याज्ञिक साईनाथ मोकल याने 'सुरत पिया के फिर बीसराई' या शास्त्रीय गीत गायनाने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले. अगदी परीक्षकांना सुद्धा निशब्द केले. त्याच्या या सादरीकरणाने गट क्रमांक दोन मध्ये त्याने प्रथम क्रमांक पटकावला. तर याच गटात यज्ञ हृदयनाथ मोकल याने उत्तेजनार्थ क्रमांक मिळविला. या दोघांनीही गव्हाण शाखेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या दोघांचीही गायनाची तयारी याज्ञिकचे वडील आणि यज्ञाचे काका, त्यांचे मार्गदर्शक साईनाथ मोकल यांनी केली होती. तर हर्षला पाटील यांनी मार्गदर्शन केले होते.

पारितोषिक वितरण समारंभात विजयी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या सौ. ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका सौ शशिकला पाटील मॅडम, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर , लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे आणि सर्व शिक्षक वृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा भरभरून कौतुक केलं.

# कल्याणमध्ये भारताच्या पहिल्या 'इमर्सिव्ह युनिव्हर्स'चा शुभारंभ

**कल्याण :** मनोरंजन क्षेत्रातील जागतिक दर्जाचा अनुभव आता थेट कल्याणकरांच्या दारात आला आहे. आज कल्याणमधील मेट्रो जंक्शन मॉल मध्ये भारताचे पहिले 'इमर्सिव्ह युनिव्हर्स' असलेल्या 'झिंगव्हर्स'च्या शुभारंभाची मोठी घोषणा केली. वेस्ट पायोनियर प्रॉपर्टीज (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडतर्फे हे अद्भुत विश्व साकारले असून तब्बल २५,००० स्क्वेअर फुटांच्या विस्तीर्ण जागेत पसरलेले आहे. हे केंद्र केवळ एक संग्रहालय नसून, कला, विज्ञान आणि कल्पनाशक्तीचा एक अनोखा संगम आहे. कुटुंब, तरुण पिढी आणि लहान मुले अशा सर्व वयोगटातील लोकांसाठी हे ठिकाण आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

झिंगव्हर्समध्ये प्रवेश करताच अभ्यागतांना एका वेगळ्याच जगात पाऊल ठेवल्याचा भास होतो. हे एक बहु-संवेदी वातावरण आहे, जिथे प्रकाश, ध्वनी आणि जागा मानवी उपस्थितीला प्रतिसाद देतात. या ठिकाणी ३६०° प्रोजेक्शन असलेले 'झिंगडम' हे प्रवेशद्वार अंतराळाची



सफर घडवते, तर 'झिंगलो' हे जैविक प्रकाश देणाऱ्या काल्पनिक जंगलासारखे भासते, जे विशेषतः लहान मुलांसाठी आणि फोटोग्राफी प्रेमींसाठी पर्वणीच आहे. याशिवाय, 'झिंगफिनिटी' हे क्षेत्र आरशांच्या आणि प्रकाशाच्या भ्रमातून एक अनंत विश्व निर्माण करते, जे सध्याच्या 'रील्स' आणि सोशल मीडिया युगातील कंटेंट क्रिएटर्ससाठी सर्वोत्तम ठिकाण मानले जात आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाबद्दल माहिती देताना वेस्ट पायोनियर प्रॉपर्टीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव अग्रवाल म्हणाले की, झिंगव्हर्सची संकल्पना ही कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी आणि लोकांमधील कुतूहल जागृत करण्यासाठी आखली गेली आहे. जागतिक दर्जाचा अनुभव घेण्यासाठी आता परदेशात जाण्याची किंवा मोठ्या मेट्रो शहरांवर अवलंबून राहण्याची गरज नाही. कल्याण हे आता मुंबई महानगर क्षेत्रातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक केंद्र म्हणून उदयास येत असून, झिंगव्हर्समुळे या शहराला अनुभवात्मक पर्यटनाच्या नकाशावर जागतिक ओळख मिळणार आहे.

या केंद्राचे मुख्य परिचालन अधिकारी नितीन म्हात्रे यांनी सांगितले की, येथे एकूण २५ पेक्षा जास्त आकर्षणे असून प्रत्येक कोपरा काहीतरी नवीन शोधण्याची संधी देतो. सुरक्षितता आणि मनोरंजनाचा योग्य ताळमेळ साधत हे ठिकाण मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी एक संस्मरणीय सहलीचे ठिकाण ठरेल.

# संविधान दिनानिमित्त समतादूत मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी ) पुणे यांच्यामार्फत संविधान दिनानिमित्त ठाणे जिल्हयामध्ये समतादूत मार्फत संविधान सप्ताह साजरा केला जात आहे.उद्घाटन समारोह दि.२६ नोव्हेंबर रोजी संविधान रॅली व उद्देशिका वाचन करून संपन्न झाला. तसेच विविध स्पर्धा, (निबंध, वक्तृत्व प्रश्नमंजुषा, प्रबोधन), पथनाट्यद्वारे संविधान मधील कलम, संविधानाचे महत्व, आपले हक्क, कर्तव्य यावर माहितीपर कार्यक्रम असे 2 डिसेंबर पर्यंत सप्ताह साजरा होणार आहे. हा कार्यक्रम महासंचालक सुनील वारे, निबंधक विशाल लोंढे, विभाग प्रमुख डॉ.बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात आहे, अशी माहिती बार्टीच्या ठाणे जिल्हा प्रकल्प अधिकारी मेघा मनोज पवार यांनी दिली आहे.

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राज्यभर विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याच उपक्रमाचा एक एक भाग म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी ), पुणे यांच्या विद्यमाने संपूर्ण जिल्ह्यात २६ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात २६ नोव्हेंबर रोजी 'वॉक फॉर संविधान' रॅलीने झाली. या उपक्रमात शेणवे विभाग हायस्कूल, शेणवे, विद्या प्रसारक मंडळ शहा सरूपचंद माध्यमिक व कनिष्ठ विद्यालय, किन्हवली, महात्मा ज्योतिबा फुले आश्रम शाळा, आर के अभ्यंग महाविद्यालय, बहुजन हिताय बहुजन सुखाय बुद्ध विहार, मॉडेल स्कुल, नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. २२ या शाळांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या शैक्षणिक शाळा, महाविद्यालयांमध्ये संविधान उद्देशिका वाचन, अभिवादन, व्याख्यांनाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संविधान जनजागृती साठी संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन, चालता बोलता कार्यक्रम अशा विविध उपक्रमाचे आयोजन संपूर्ण आठवडाभर केले आहे.

हा उपक्रम बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असून निबंधक विशाल लोंढे, विभाग प्रमुख डॉ.बबन जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रकल्प अधिकारी मेघा पवार यांच्या नियोजनात जिल्ह्यातील सर्व समतादूतांच्या माध्यमातून विविध ठिकाणी कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.सामाजिक बांधिलकी वाढविणे, हे या सप्ताहाचे उद्दिष्ट आहे.




# वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत फिजा सय्यद हिला सुवर्णपदक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अकोले :** ४७ वी वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत अकोलेची कन्या आंतरराष्ट्रीय खेळाडू फिजा सय्यद हिने सुवर्णपदक पटकावले आहे.

१४ ते १८ डिसेंबर २०२५ पासून पश्चिम बंगालमधील दत्तापुलिया येथे वरिष्ठ राष्ट्रीय सॉफ्टबॉल आयोजित केली आहे. या स्पर्धेचे आयोजन सॉफ्टबॉल असोसिएशन ऑफ इंडिया आणि पश्चिम बंगाल सॉफ्टबॉल असोसिएशन यांनी केले आहे.

या स्पर्धेत देशभरातील अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरुष आणि महिला खेळाडू त्यांची ताकद, कौशल्य आणि सांघिक भावना दाखवतात. या स्पर्धेत फिजा सय्यद हिने उत्कृष्ठ कामगिरी करत सुवर्णपदक मिळवले आहे.

फिजा सय्यद ही नगर जिल्ह्यातील दुर्गम डोंगराळ व आदिवासी तालुक्यातील कन्या असून अनेक आंतरराष्ट्रीय सामन्यात तिने भारताचे प्रतिनिधित्व केले आहे.



सन 2013 पासून सॉफ्टबॉल या खेळामध्ये सातत्याने सहभाग असून तालुकास्तरापासून आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत विविध स्पर्धांमध्ये यशस्वीरित्या सहभाग घेतला आहे. सन 2017 मध्ये 24 वी सीनियर महाराष्ट्र सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा मुंबई सिटी सॉफ्टवेअर असोसिएशन मुंबई या स्पर्धेमध्ये रनरअप मिळाले. सन 2018 मध्ये 24 वी जूनियर नॅशनल महाराष्ट्र राज्य सॉफ्ट बॉल चॅम्पियनशिप स्पर्धा औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या स्पर्धेमध्ये कास्य पदक मिळाले. सन 2018 - 2019 मध्ये 36 वी जूनियर नॅशनल सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा चित्तूर (आंध्र प्रदेश) मध्ये संपन्न झाली. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला सुवर्णपदक मिळवून देण्यात मोठा वाटा होता. सन 2018 मध्ये इंडियन टीम ऑफ अंडर 19 मध्ये सातव्या एशियन ज्युनिअर वूमन सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप क्लार्क फिलिपिन्स येथे झालेल्या स्पर्धेमध्ये भारतीय संघाकडून उत्कृष्ट प्रदर्शन केले. 14 डिसेंबर ते 17 डिसेंबर 2022 मध्ये एशियन वुमन युनिव्हर्सिटी सॉफ्टबॉल चॅम्पियनशिप, पटाया, थायलंड येथे भारतीय संघाकडून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.

आजपर्यंत क्रीडा सामाजिक राजकीय शैक्षणिक राष्ट्रीय राज्यस्तरीय जिल्हास्तरीय क्षेत्रामध्ये अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. यावर्षीचा जिल्हा क्रीडा पुरस्कार तिला पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मिळाला आहे.

# कल्याण तालुक्यातील वसद गावात बिबट्याचा हल्ला

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील वसद गावात बिबट्याने गाईच्या वासरांचा फडशा पडला आहे. वसद येथील एका फार्महाऊस मधील गोठ्यात घुसून बिबट्याने तीन वासरांवर हल्ला करून ठार केल्याची घटना घडल्याने परिसरात भिती युक्त वातावरण पसरले आहे.

**फार्महाऊस मधील तीन वासरे ठार**

सुत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार वसद गाव परिसरातील एका फार्महाऊस मधील गोठ्यात शुक्रवारी पहाटे च्या सुमारास बिबट्या ने शिरकाव करीत आठ दिवसीय दोन वासरे आणि एक दीड वर्षीय वासरावर हल्ला केला. बिबट्या ने केलेल्या हल्यात तिन्ही वासरांचा जागीच मृत्यू झाला असून परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हा हल्ला शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडल्याला असल्याची माहिती कल्याण वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही मनुष्यहानी झाली नाही. संदर्भीत क्षेत्रातील वनपाल राजू शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळताच कल्याण वनविभागाचे अधिकारी आणि पशुवैद्यकीय अधिकारी वसत गावातील नाडर फार्महाऊसवर दाखल झाले असून पंचनामा केला आहे. तर याठिकाणी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्याची व्यवस्था देखील वनविभागाकडुन करण्यात येत आहे. राज्यभरात बिबट्याचे हल्ले नागरिकांवर होत असल्याने बिबट्यांच्या या हल्ल्यामूळे नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण पसरले आहे. दोन ते तीन दिवसांपासून हा बिबट्या या परिसरात दिसत असून याबाबत वनविभागाच्या हद्दीचा प्रश्न निर्माण होत असल्याने तात्काळ प्रतिसाद मिळत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. या घटनेनंतर परिसरात दक्षता वाढवण्यात येत असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024